दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

आजचा सुविचार

"आजचा दिवस हा नवीन सुरुवातीची संधी आहे; मेहनतीवर विश्वास ठेवा आणि नवीन उमेदीने पुढे चला."

छत्रपती संभाजीनगर ❀ रवीवार दि. 29 नोव्हेंबर - 2026 ❀ वर्ष ;1 ❀ अंक ; 194 ❀ पाने .4 ❀ किमंत 4 रू ❀ email:hinduprakashvarta@gmail.com / Postal Regn ,No, ABD/551/2026/2028

1 डिसेंबरपासून बदलणार 5 मोठे नियम

नोव्हेंबर महिना संपण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असून, डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीपासून सर्वसामान्यांच्या दैनंदिन खर्चावर परिणाम करणारे अनेक महत्त्वाचे बदल लागू होणार आहेत. 1 डिसेंबर 2026 पासून एलपीजी सिलिंडरच्या किमती, एसबीआय क्रेडिट कार्डचे शुल्क, टाटा मोटर्सच्या कारच्या किमती, सेबीचे ट्रेडिंग नियम आणि जीएसटी नोंदणी प्रक्रियेत बदल होणार आहेत. या बदलांचा परिणाम घरगुती बजेटपासून ते वाहन खरेदी आणि व्यावसायिक व्यवहारांपर्यंत होऊ शकतो. त्यामुळे नवीन महिन्यापासून नेमके कोणते बदल होणार आहेत

थोडक्यात वार्ता

ग्रामीण भागात धुक्याची चादर

पुणे : जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव आणि शिरूर तालुक्यांमध्ये पहाटेच्या वेळी दाट धुके पडत असल्याचे चित्र आहे. दिवसा ऊन, रात्री थंडी आणि सकाळी धुके असे बदलते वातावरण पाहायला मिळत आहे. या वातावरणामुळे शेतीतील पिकांवर रोगराई पसरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी पिकांची योग्य काळजी घेण्याची गरज आहे.

हवाई दलाच्या कसरतींनी आकाश उजळले

सातारा : जिल्ह्यात भारतीय हवाई दलाच्या सूर्यकिरण पथकाच्या हवाई कसरतींनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला हजारो नागरिकांनी उपस्थिती लावली. आकाशात सादर करण्यात आलेल्या विविध कसरतींनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. २६/११ हल्ल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

वाढवण बंदराविरोधात आंदोलन

पालघर : जिल्ह्यातील वाढवण बंदराविरोधात स्थानिक नागरिकांचे आंदोलन सुरू आहे. संविधान दिनानिमित्त आंदोलकांनी महामार्गाच्या कामाच्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी आंदोलकांना अडवले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. बंदराच्या प्रश्नावर स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी कायम आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीकडे लक्ष

सोलापूर : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी २६ नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांनी सहभाग घेतला. नऊ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीच्या निकालाकडे जिल्ह्यातील राजकीय आणि सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

तळवाडी फार्महाऊसवर पोलिसांची कारवाई

छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण पोलिसांनी तळवाडी येथील फार्महाऊसवर कारवाई करून कथित वेश्याव्यवसायाचे प्रकरण उघडकीस आणले. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दुष्काळाचे संकट ओळखून प्रशासनाचा 'अलर्ट मोड

नाशिक : प्रतिनिधी



संभाव्य दुष्काळाचे आव्हान लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहावे. जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची आणि जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी नियोजन करावे. रोजगार, पाणीपुरवठा आणि पशुधनाच्या गरजांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.यावेळी महाजन म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीत पाणी, चारा आणि रोजगाराची कमतरता भासू नये. सर्व अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून जबाबदारीने काम करावे. जिल्हा वार्षिक योजनेतील मंजूर कामे वेळेत व दर्जेदार पूर्ण करावीत. कायदा व सुव्यवस्था, अखंडित वीजपुरवठा आणि नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण याकडेही लक्ष द्यावे. विकासकामे करताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांना गती देतानाच दुष्काळी नियोजनाला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. गोदावरीत सांडपाणी मिसळू नये, यासाठी सांडपाणी वाहिन्या व प्रक्रिया केंद्रांची कामे सुरू असून, चार ते पाच महिन्यांत ती पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. कुंभमेळ्यापूर्वी रामकुंड परिसरात स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. शहरात सुमारे ७० हजार झाडे लावण्यात आली असून, त्यांच्या संगोपनासाठी ठिबक सिंचनाद्वारे पाणी व खत दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पायाभूत सुविधा, इमारतींची दुरुस्ती आणि शैक्षणिक गरजांसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच पुढील नऊ महिन्यांतील संभाव्य दुष्काळ लक्षात घेऊन पाणी, चारा आणि रोजगार हमी योजनेच्या कामांचे नियोजन करण्याचे आवाहन केले. आमदार सुहास कांदे यांनीही मनोगत व्यक्त केले. महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी महापालिकेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सिंहस्थ कुंभमेळा व जिल्हा वार्षिक योजनेतील विकासकामांचा आढावा सादर केला. या कामांमुळे स्थानिक उद्योग, व्यवसाय आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीत लोकप्रतिनिधींनी विकासकामे, नागरिकांच्या समस्या आणि दुष्काळी उपाययोजनांबाबत सूचना मांडल्या. जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.१२०३ कोटींचा विकास आराखडा मंजूराशिक जिल्ह्याच्या विकासकामांसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होत असला, तरी मागील वर्षांतील अपूर्ण कामांचे दायित्व अर्थात 'स्पिल ओव्हर' यंदाही नियोजनातील मोठा अडथळा ठरत आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्याला १ हजार ५५१ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर झाला आहे. मात्र, त्यातील मोठा हिस्सा जुन्या कामांची देणी भागविण्यासाठी खर्च होणार आहे. ४४८.७६ कोटी रुपयांचे प्रलंबित दायित्व लक्षात घेता, नव्या विकासकामांसाठी १२०३ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे.सर्वसाधारण योजनेवर ४४८.७६ कोटींचा स्पिल ओव्हर२०२४-२५ मधील ३२९.४४ कोटी रुपयांच्या दायित्वापैकी १७४.४२ कोटी रुपये अदा करण्यात आले. त्यानंतर २०२५-२६ मधील २९३.७४ कोटी रुपयांच्या दायित्वाची भर पडल्याने यंदा एकूण प्रलंबित दायित्व ४४८.७६ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. मंजूर नियतव्ययातील ४६.५ टक्के निधी जुन्या कामांची देणी भागविण्यासाठी खर्च होणार आहे.नुसूचित जाती उपयोजनेतही निधी रखडलाअनुसूचित जाती उपयोजनेतील ३३.०१ कोटी रुपयांच्या जुन्या दायित्वापैकी केवळ ३.८५ कोटी रुपये अदा करण्यात आले असून, २९.१६ कोटी रुपये अद्याप प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे, नोव्हेंबरअखेर नव्या कामांसाठी एक रुपयाचाही निधी वितरित झालेला नाही.कुंभमेळ्यापूर्वी गोदावरी स्वच्छ करण्याचे उद्दिष्टगोदावरीत सांडपाणी मिसळू नये, यासाठी सांडपाणी वाहिन्या व प्रक्रिया केंद्रांची कामे सुरू आहेत. आगामी चार ते पाच महिन्यांत ही कामे पूर्ण करून कुंभमेळ्याच्या मुख्य पर्वणीपूर्वी रामकुंड परिसरात स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट असल्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महाराष्ट्र राज्य विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष तथा आमदार सुहास कांदे, खासदार डॉ. शोभा बच्छाव, खासदार भास्कर भगरे, आमदार किशोर दराडे, आमदार पंकज भुजबळ, आमदार गोकुळ गीते, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार दिलीप बोरसे, आमदार नितीन पवार, आमदार दिलीप बनकर, आमदार ॲड. राहुल ढिकले, आमदार सीमा हिरे, आमदार सरोज अहिरे, आमदार हिरामण खोसकर, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक डॉ.डी.एस.स्वामी,उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, राकेश सेपट, आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे (नाशिक), डॉ. कश्मिरा संख्ये (कळवण), जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त देविदास नांदगावकर, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी दत्ता आव्हाड, प्रकाश काळे आदी उपस्थित होते.

कोस्टल रोडवरील वरळी जेट्टी परिसरात उभारणार हेलिफॅड

मुंबई (विशेष प्रतिनिधी) :



धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) वरील, वरळी जेट्टी येथील विद्यमान जेट्टीचा विकास आता विकासासाठी सार्वजनिक खाजगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर केला जाणार आहे. तसेच याठिकाणी हॅलिपॅडही उभारण्यात येणार आहे. यासाठी रेमंड लिमिटेड यांची निवड करण्यात आली आहे. याठिकाणी लँडींग किंवा टेक-ऑफच्या संख्येची अट न ठेवता, दरमहा एक लाख रुपये ही निश्चित रक्कम महानगरपालिकेला द्यावी लागेल. याशिवाय, हेलिपॅडवरून होणाऱ्या व्यावसायिक हेलिकॉप्टर लँडींगआणि टेक-ऑफमधून दरमहा मिळणाऱ्या महसुलाच्या 50 टक्के रक्कम किंवा चार लाख रुपये यांपैकी जी रक्कम महापालिकेच्या तिजोरीत जमा होणार आहे.मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाच्या (दक्षिण) बांधकामादरम्यान, डिझाइन बिल्ड कंत्राटदारांमार्फत बांधकाम साहित्याच्या वाहतुकीसाठी वरळी डेअरीसमोर एक तात्पुरते धक्का (जेट्टी) बांधण्यात आली होती. या जेट्टीचे रूपांतर आता वैद्यकीय स्थलांतर / आपत्कालीन स्थलांतर, किनारी निगराणी, सराव आणि गस्त घालणे, नैसर्गिक आपत्तींच्या वेळी जनतेला मदत करण्यासाठी, व्हीव्हीआयपी / व्हीआयपींच्या उड्डाणांना, सार्वजनिक/ शासकीय संस्थांच्या हितासाठी हॅलिफॅडसाठी केले जाणार आहे.आयआयटी तसेच पवन हंसच्या निष्कर्षांवर आधारित, जेटीचे रूपांतर हेलिपॅड मध्ये करण्याकरिता, सुविधा विकसित करण्यासाठी, देखभाल करण्यासाठी आणि संयोजन करण्यासाठी 'जसे आहे तसे' या तत्त्वावर पीपीपी ऑपरेटरची नियुक्ती करण्याचे ठरले. त्यानुसार , स्वारस्याची अभिव्यक्ती म्हणून मागवण्यात आले. यामध्ये रेमंड लिमिटेडची निवड करण्यात आली आहे. जेट्टीचा विकास, बांधकाम, संचालन व देखभाल आणि आवश्यक त्या मंजू-या संदर्भातील सर्व खर्च रेमंड लिमिटेड यांच्याकडून करण्यात येतील.रेमंड लिमिटेड यांची वरळी येथील विद्यमान जेट्टीच्या विकासासाठी पीपीपी ऑपरेटर म्हणून नियुक्ती करण्याकरिता आर्थिक भागिदारी तत्त्वावर ज्यामध्ये परवान्यासाठी वास्तुशास्त्रीय बदल करणे, डीजीसीए परवानाधारक हेलिपॅडसाठी असलेल्या सर्व सुविधा पुरवणे, हेलिपॅडचे अनिवार्य सुरक्षित आणि कार्यक्षम संचालन व करण्यासाठी नियुक्त करण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात आला होता. या प्रस्तावाला स्थायी समिती अध्यक्षांनी मंजुरी दिल्यामुळे हा प्रस्तावानुसार पुढील कार्यवाही आता केली जाणार आहे. या माध्यमातून महापालिकेच्या महसूलात भर पडणार आहे

60 वर्षीय महिलेला गर्दुल्यांने मारहाण करत अत्याचार



मुंबई : प्रतितनिधी

राज्याची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत महिलांच्या सुरक्षेचे धिंडवडे निघत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. मध्य रेल्वेच्या अत्यंत वर्दळीच्या समजल्या जाणाऱ्या घाटकोपर रेल्वे स्थानकावर एका 60 वर्षीय ज्येष्ठ महिलेवर लैंगिक अत्याचार झाल्याची संतापजनक घटना गुरुवारी रात्री उशिरा घडली. या घटनेमुळे उपनगरीय रेल्वे स्थानकांवरील सुरक्षेच्या त्रुटी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आल्या असून प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नेमकी घटना काय?पीडित 60 वर्षीय महिला ठाणे जिल्ह्यातील खडवली येथील रहिवासी असून त्या मजुरीचे काम करण्यासाठी दररोज घाटकोपरला येतात. गुरुवारी त्या आपल्या 18 वर्षीय मुलीसोबत कामासाठी घाटकोपरला आल्या होत्या. दिवसभराचे काम आटोपून घरी परतण्यासाठी दोघीही रात्री घाटकोपर रेल्वे स्थानकात आल्या होत्या. प्लॅटफॉर्म क्रमांक 2 वर त्यांची मुलगी खडवली लोकलची वाट पाहत उभी होती, तर रात्री 11 वाजून 12 मिनिटांच्या सुमारास पीडित महिला प्लॅटफॉर्मवरील सार्वजनिक शौचालयात गेल्या होत्या.नराधमाने साधली संधीरात्रीची वेळ असल्याने या शौचालयात कोणताही कर्मचारी उपस्थित नव्हता. याच गोष्टीचा फायदा घेत 25 वर्षीय आरोपीने महिलेचा पाठलाग केला आणि त्यांच्या मागोमाग शौचालयात प्रवेश केला. आरोपीने आतून शौचालयाचा दरवाजा बंद केला आणि पॅसेजमध्येच या 60 वर्षीय महिलेवर बळजबरी करत लैंगिक अत्याचार केला. महिलेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता नराधमाने तिच्या कपाळावर जोरदार मारहाण केली, ज्यामुळे त्या जखमी झाल्या. अवघ्या सात मिनिटांत हे कृत्य करून आरोपी 11 वाजून 19 मिनिटांनी शौचालयातून बाहेर पडला आणि घाटकोपर मेट्रो स्थानकाच्या दिशेने पसार झाला.पोलिसांची तात्काळ कारवाई आणि अटकरात्री 11 वाजून 22 मिनिटांनी घाबरलेल्या अवस्थेत पीडित महिला शौचालयातून बाहेर आल्या आणि त्यांनी घडलेला सर्व प्रकार आपल्या मुलीला सांगितला. दोघींनी तात्काळ प्लॅटफॉर्म क्रमांक 4 वरील लोहमार्ग पोलीसनी रेल्वे स्थानक आणि मेट्रो परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, आरोपी शौचालयात जाताना आणि बाहेर पडताना स्पष्टपणे कैद झाला होता. या तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी विविध पथके तयार करून घाटकोपरमधील असल्फा परिसरातून तस्लीम नूर मोहम्मद (वय 25) या आरोपीला शुक्रवारी अटक केली. या आरोपीची यापूर्वीची काही गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

दादर व चेंबूर येथील जलतरण तलावांची महिला बालकल्याण समिती अध्यक्षांची अचानक पाहणी

दादर : प्रतिनिधी



दादर (पश्चिम) आणि चेंबूर येथील महानगरपालिका जलतरण तलावांना बुधवारी २५ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबई महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा मीनल संजय तुर्डे यांनी भेट देऊन तेथील व्यवस्थापन, देखभाल आणि सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. या पाहणी दरम्यान जलतरण तलावांच्या दैनंदिन कामकाजात तसेच आवश्यक सुविधांच्या उपलब्धतेबाबत सुधारणा करण्याचे निर्देश तुर्डे यांनी दिले. जलतरण तलावांच्या निर्धारित नियमांनुसार आवश्यक संख्येने लाइफगार्ड उपस्थित असणे, फिल्टरेशन प्लांट नियमितपणे कार्यरत ठेवणे, तसेच आवश्यक सुरक्षा साधनसामग्री उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. नागरिकांच्या आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या सुविधांकडे अधिक काटेकोरपणे लक्ष देण्याचे निर्देशही तुर्डे यांनी दिले. यावेळी संबंधित कंत्राटदारांच्या कामकाजाचा तसेच जलतरण तलावांच्या देखभाल व्यवस्थेचाही आढावा घेण्यात आला. महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असून, कंत्राटदारांनी निर्धारित अटी व नियमांचे पालन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच, जलतरण तलावांमधील क्लोरीनेशन प्रक्रियेसाठी नियुक्त कंपनीच्या कामकाजाची सखोल तपासणी करून आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करावी. संबंधित कामकाजात नियमांचे उल्लंघन किंवा निष्काळजीपणा आढळल्यास नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याबाबतही त्यांनी प्रशासनाला सूचित केले. महानगरपालिकेच्या जलतरण तलावांमध्ये येणाऱ्या नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी लाइफगार्डची पुरेशी उपलब्धता, फिल्टरेशन यंत्रणेचे नियमित कार्यान्वयन, पाण्याची गुणवत्ता यांनी सांगितले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकिय

उद्याने कुणाच्या ताब्यात?

कुर्ला येथील प्रमोद महाजन उद्यानात छायाचित्रे काढणाऱ्या तरुण-तरुणीभोवती मुलांचा गराडा पडला आणि काही क्षणांत काठ्या उगारल्या गेल्या. तरुणी सोबत्याला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना तिलाही मार बसला. पळून जाणाऱ्या दोघांचा पाठलाग झाला. या संतापजनक दृश्याने सार्वजनिक जागेवर अधिकार नागरिकांचा की दहशत माजवणाऱ्या टोळक्यांचा, हा प्रश्न उपस्थित केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार मुलांनी आक्षेपार्ह टिप्पणी केल्यावर दोघांनी विरोध केला; वाद वाढला आणि टोळक्याने त्यांना घेरले. तरुणाच्या पाठीवर हॉकीच्या काठीने प्रहार करण्यात आला

. लाथाबुक्क्यांनीही मारहाण झाली. तरुणीने हस्तक्षेप केला असता तिलाही काठीने मारण्यात आले. स्थानिकांनी केलेले चित्रीकरण प्रसारित झाल्यावर प्रकरणाला व्यापक प्रसिद्धी मिळाली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा नोंदवून आठ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. बाल न्याय मंडळाने मुलांना निरीक्षणगृहात पाठवले. महापालिकेने सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींवर संबंधित कंत्राटदाराला एक लाख रुपयांचा दंड आणि कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

राज्य मानवाधिकार आयोगाने पोलीस आयुक्त आणि महापालिका आयुक्तांकडून अहवाल मागवला आहे. आता उद्यानाला मुख्य रस्त्यावरून थेट प्रवेश नसल्याचाही प्रश्न पुढे आला. उद्यान बंद करणे किंवा तात्पुरती धडक कारवाई करणे म्हणजे नागरिकांना सुरक्षित सार्वजनिक जागा उपलब्ध करून देणे नव्हे. घटनेच्या वेळी रक्षक कुठे होते, मदत किती वेळात पोहोचली आणि कंत्राटाच्या अटी पाळल्या गेल्या का, याची उत्तरे हवीत. त्याचबरोबर एकत्र फिरणे, छायाचित्र काढणे किंवा सार्वजनिक जागेत बसणे यासाठी कोणत्याही टोळक्याची परवानगी लागत नाही. संविधानाने दिलेली समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा या हक्कांचा पाया आहे. स्वतःला नैतिकतेचा रखवालदार समजून दुसऱ्याला धमकावणे हा केवळ गैरवर्तनाचा प्रश्न नाही; ते इतरांच्या नागरिकत्वालाच आव्हान आहे. त्यामुळे झुंडशाही केली तर कठोर कारवाई झाल्याशिवाय राहणार नाही, असा संदेश समाजात गेला पाहिजे. अल्पवयीन हिंसेचे चित्र समजण्यासाठी वस्तुस्थिती पहावी लागेल. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या २०२४ च्या आकडेवारीनुसार अल्पवयीनांचा सहभाग असलेली

नोंदवलेली प्रकरणे २०२३ मधील ३१,३६५ वरून ३४,८७८ झाली. वाढ सुमारे ११.२ टक्के होती. २०२४ मध्ये ताब्यात घेतलेली मुले ४२,६३३ होती. मुलांच्या वर्तनामागे घरातील हिंसा, दुर्लक्ष, मित्रांचा दबाव, शाळेशी तुटलेले नाते, स्थानिक संघर्ष किंवा समाजमाध्यमांवरील हिंसेचे उदात्तीकरण अशी अनेक संभाव्य कारणे असू शकतात. टोळीत वैयक्तिक जबाबदारी विरघळते आणि दुसऱ्यावर वर्चस्व गाजवणे धाडस वाटू लागते. मुलांना हिंसा हा खेळच वाटू लागला तर समाजाची दुरावस्था सुरु होते. अशी पिढी काही दशकांनंतर समाजाला महागात पडू शकते. म्हणून वेळीच दखल घेणे आवश्यक आहे. या प्रकरणात शेजारील मदरशाच्या बांधकामाची पाहणी करण्यासाठी महापालिकेने नोटीस दिली आ

हे.न मिळणारी मान्यता आणि समाजमाध्यमांवर हिंसक चित्रफितींना मिळणारे प्रोत्साहन यामुळे परिणामांची जाणीव कमी होऊ शकते. म्हणून प्रतिबंधाचा कार्यक्रम मुलांना दोषी ठरवण्यापुरता मर्यादित ठेवता येणार नाही. याचा अर्थ गरिबी, धार्मिक ओळख किंवा विशिष्ट वस्तीत राहणे हीच हिंसेची कारणे आहेत, असा नाही. संकटांत वाढलेली अनेक मुले जबाबदार नागरिक बनतात. उलट सुरक्षित घरात आणि प्रशिक्षित तज्ज्ञांकडून मूल्यमापन यावर भर हवा. प्रतिबंधाला कलंकाची जोड दिल्यास गरजू कुटुंबे मदतीपासून दूर जातील. महापालिकेचा दंड ही सुरुवात आहे. रक्षकांची उपस्थिती, दिव्यांची स्थिती, तक्रारींची नोंद आणि गस्तीचे वेळापत्रक यांचे नियमित परीक्षण झाले पाहिजे. अशी व्यवस्था केल्यास जबाबदारी केवळ कागदावर राहणार नाही. राज्य सरकारने बाल न्याय मंडळे, निरीक्षणगृहे आणि समुपदेशन सेवांना पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. अन्यथा कायद्याच्या तरतुदी असूनही अंमलबजावणी कमकुवत राहील. पालकांनी दुर्लक्ष केले, संस्थांनी प्रश्न टाळले आणि प्रशासनाने जबाबदारी झटकली तर त्याची किंमत पीडितांसह पुढच्या पिढीलाही मोजावी लागेल. कायद्याचा धाक, संवेदनशील संस्कार आणि नागरिकांचे संरक्षण या तिन्हींची सांगड घालणे ही सामूहिक जबाबदारी आहे. उद्याने सुरक्षित नसतील तर स्वातंत्र्य कुठे फुलेल?

निसर्गाचा कोप की मानवी लोभ?

प्रा. भास्कर खंडागळे

निसर्गाचे बदलते रूप केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग'चे अपत्य नाही, तर ते आपण विकासाच्या नावाखाली केलेल्या पर्यावरणाच्या कत्तलीचे आणि नियोजनाच्या नावाने चालवलेल्या अनागोंदीचे थेट फलित आहे. मुंबई, पुणे, बंगळुरूसारखी महानगरे पाण्याखाली जाणे, सह्याद्रीचा कणा ढासळणे ही आता नैसर्गिक नव्हे, तर मानवनिर्मित आपत्ती बनली आहे.

पर्जन्यराजाचे आगमन झाले, की एके काळी बळीराजाच्या डोळ्यात कृतज्ञतेचे प्रबोधन व्हायचे आणि चाकरमान्यांच्या मनात आनंदाचे तरंग उमटायचे; पण आज परिस्थिती बदलली आहे. आता मॉन्सून येतो तो 'आनंद' घेऊन नाही, तर 'धडकी' भरवून... हवामान विभागाने जाहीर केलेल्या देशाच्या मॉन्सून नकाशावर नजर टाकली, तर संपूर्ण देश एका विचित्र हवामान विसंगतीच्या विळख्यात अडकलेला दिसतो. कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे जलप्रलय! 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सून सुरुवातीला रेंगाळला, देशातील बहुतांश राज्ये कोरडी राहिली, तर दुसरीकडे अवघ्या काही दिवसांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडून शहरांची आणि नद्यांची दुरवस्था झाली. आज देशातील प्रत्येक मोठे शहर पहिल्याच मुसळधार पावसात 'बेटा'चे स्वरूप धारण करते. शहरे का तुंबतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी फार मोठ्या तज्ज्ञांची गरज नाही. याचे मूळ आपल्या चुकीच्या नागरीकरणात आणि काँक्रीटीकरणाच्या अघोरी हव्यासात दडलेले आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण शहरांमधील मातीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने गाडून टाकला आहे. पूर्वी पडणारा पाऊस जमिनीमध्ये जिरायचा. त्यामुळे भूजल पातळी वाढायची आणि पाण्याचा प्रवाह संथ व्हायचा. आज शहरांमध्ये माती उरलीच नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब थेट रस्त्यावर येतो. काँक्रीटीकरणामुळे पाण्याचा नैसर्गिक निचराच पूर्णपणे बंद झाला आहे. त्यात भर पडली आहे ती आपल्या निकृष्ट ड्रेनेज सिस्टीमची. ब्रिटिश काळात किंवा त्यापूर्वी बांधलेल्या वाहिन्यांवर आज कोट्यवधींच्या लोकसंख्येचा आणि सिमेंटच्या जंगलाचा भार टाकला जात आहे. परिणामी, पुढील आक्रीत ओढवते.

कचरा, प्लास्टिक आणि गाळाने तुंबलेले नाले आणि गटारे एवढ्या प्रचंड पाण्याचा भार पेलू शकत नाहीत. परिणामी, रस्ते हेच नद्या बनतात आणि चकचकीत महानगरे काही तासांमध्येच दलदलीत रूपांतरित होतात. बंगळुरू आणि पुणे ही देशातील 'आयटी हब' आणि शिक्षणाची माहेरघरे म्हणून ओळखली जाणारी शहरे आज पूरपरिस्थितीचे सर्वात मोठे बळी ठरत आहेत. बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेने मिळून शहरांचा गळा घोटला आहे. पुणे असो वा बंगळुरू; इथे नैसर्गिक ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषा बुडवून टोलेजंग इमारती, 'आयटी पार्क' आणि गृहप्रकल्प उभे राहिले आहेत.



बंगळुरूसारख्या शहरात पूर्वी शेकडो तलाव होते. ते एकमेकांशी नैसर्गिक नाल्यांनी जोडलेले होते. अतिरिक्त पाणी एका तलावातून दुसऱ्या तलावात वाहून जायचे. आज ते सर्व नाले आणि तलाव गिळंकृत करून त्यावर सिमेंटचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुण्यातही बंगळुरूची पुनरावृत्ती झाली आहे. मुळा-मुठा नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, रामनदी आणि इतर छोट्या ओढ्यांचे अस्तित्व मिटवून टाकल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरलेली नाही.

यासंदर्भात मावळातून वाहणाऱ्या आणि पिंपरी-चिंचवड, पुण्याची तहान भागवणाऱ्या पवना नदीचे उदाहरण ताजे आहे. पवना नदीच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला, की धरणातून विसर्ग करावा लागतो; मात्र नदीपात्र अरुंद झाल्यामुळे आणि पात्रातच राडारोडा, बांधकामे झाल्यामुळे हे पाणी आजूबाजूच्या नागरी वस्त्यांमध्ये शिरते. यंदा पवना नदीला आलेल्या पुरामुळे शेकडो कुटुंबांना आपले घरदार सोडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. देहू, आळंदी परिसरातून वाहणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदीचा प्रकोपही यंदा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे केवळ शेतीचेच नुकसान झाले नाही, तर उद्योग आणि वाहतुकीचा कणा मोडला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकण आणि आसपासच्या परिसरात तीन-चार फूट पाणी साचल्याने अलिकडेच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. हा महामार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. इथे हजारो औद्योगिक कंपन्या आहेत; पण पाण्याचा निचरा होण्यासाठी महामार्गाच्या कडेला आवश्यक त्या वाहिन्याच तयार केल्या गेल्या नाहीत. आजूबाजूच्या टेकड्या आणि नैसर्गिक नाले बुजवून कंपन्या आणि व्यावसायिक गाळे उभारल्यामुळे महामार्गच एका मोठ्या धरणात रूपांतरित झाला. शहरांची ही अवस्था असताना, महाराष्ट्राचे कवच मानल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वेगळेच आणि अत्यंत भीतीदायक संकट उभे राहिले आहे. महाबळेश्वर, ताम्हिणी, माळशेज, वरंधा आणि आंबेनळी घाटात दर वर्षी होणाऱ्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सह्याद्रीचा डोंगर खचत आहे, रस्ते वाहून जात आहेत आणि दरडी कोसळून निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. माळीणच्या आठवणी अजून ताज्या असताना आता मावळात पाटणची घटना सुन्न करणारी ठरली. पर्यटन आणि विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर चाललेली अंदाधुंद तोडफोड ही त्याची कारणे आहेत. रिसॉर्ट्स बांधण्यासाठी, रस्ते रुंदीकरणासाठी डोंगरांचे पायथे जेसीबी लावून उकरले जात आहेत.

डोंगरांना धरून ठेवणारी झाडे नष्ट केली जात आहेत. यामुळे डोंगराची माती सैल होते आणि मुसळधार पाऊस झाला, की ती थेट खाली कोसळते. सह्याद्रीच्या पर्यावरणाशी चाललेला हा खेळ केवळ घाटापुरता मर्यादित नसून, संपूर्ण किनारपट्टी आणि दख्खनच्या पठाराला धोक्यात आणणारा आहे. या संपूर्ण प्रलयात सर्वात मोठी शोकांतिका पुढेच आहे. एका बाजूला शहरे पाण्यात बुडत असताना 'सेंट्रल वॉटर कमिशन'च्या अहवालानुसार देशातील प्रमुख १६६ धरणांमध्ये केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जलाशयांची पातळी सामान्यपेक्षा ४० ते ५० टक्क्यांनी खाली आहे. याचा अर्थ पडणारा पाऊस आपण साठवू शकत नाही. कमी कालावधीत जास्त पावसामुळे पाणी वेगाने वाहून जाते, महापूर येतो आणि पाणी समुद्राला मिळते नीती आयोग म्हणतो, की २०३० पर्यंत देशातील २१ मोठ्या शहरांमधील भूमिगत पाणी संपुष्टात येईल. आपण आज पडणारे पाणी जमिनीखाली जिरवू शकलो नाही, तर पावसाळ्यात पुराच्या पाण्यात बुडणारी हीच शहरे उन्हाळ्यात पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभी असलेली दिसतील. आपण आताच सुधारलो नाही, तर डॉ. इस्माइल सेरागेल्डिन यांनी वर्तवलेले भाकीत खरे ठरेल. त्यांच्या म्हणण्यानुसार पुढील युद्धे पाण्यासाठीच होतील. या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला युद्धपातळीवर काही पावले उचलावी लागतील. शहरांमधील ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषेवरील सर्व बांधकामे तात्काळ पाडावी लागतील. 'स्पंज सिटी' ही संकल्पना राबवून शहरांमध्ये पाणी शोषून घेणारी उद्याने आणि खुली मैदाने राखली पाहिजेत. रस्ते बांधताना आणि गल्लीबोळात पेविंग ब्लॉक बसवताना पाण्याचा निचरा होण्यासाठी मातीचा भाग सोडणे कायद्याने बंधनकारक केले पाहिजे. घाटमाथ्यावरील आणि संवेदनशील डोंगराळ भागांमधील उत्खनन आणि बेकायदेशीर बांधकामांवर संपूर्ण बंदी घालण्याची वेळ आली आहे. माधव गाडगीळ समितीच्या अहवालाकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महामार्ग आणि लोहमार्ग बांधताना पाणी वाहून जाण्याच्या नैसर्गिक मार्गांना धक्का लागणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. या काही बाबींकडे लक्ष दिले गेल्यास उत्तम, अन्यथा येत्या काळात अनर्थ टाळता येणार नाही.

तीन दिवसीय 'बांद्रा स्टेशन महोत्सव 2026' ला उत्साहात सुरुवात

मुंबईच्या ऐतिहासिक वांद्रे रेल्वे स्टेशनने १६२ वर्षांचा टप्पा गाठला आहे. या निमित्ताने पश्चिम रेल्वेच्या मुंबई मंडळाने २७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान 'बांद्रा स्टेशन महोत्सव २०२६' आयोजित केला आहे. स्टेशनच्या स्थापत्य कला, इतिहास आणि सांस्कृतिक वारशाचा जागर या महोत्सवातून केला जात आहे. २८ नोव्हेंबर १८६४ रोजी वांद्रे उपनगरीय स्टेशनचं उद्घाटन झालं होतं. त्या ऐतिहासिक दिवसाच्या १६२ व्या वर्धापन दिनानिमित्त हा तीन दिवसीय सोहळा रंगतोय. शुक्रवारी या महोत्सवाचं उद्घाटन झालं. राज्याचे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार, वांद्रे पूर्वचे आमदार वरुण सरदेसाई आणि मुंबई सेंट्रल मंडळाचे मंडल रेल प्रबंधक पंकज सिंह यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. यावेळी वरिष्ठ रेल्वे अधिकारीही उपस्थित होते. सोहळ्याची सुरुवात रेल्वे सुरक्षा



बलाच्या फ्लॅग मार्चने झाली.यानंतर वांद्रे स्टेशनच्या वारशाला समर्पित 'द स्टेशन दॅट मेड हिस्ट्री' या कॉफी टेबल बुकचं प्रकाशन करण्यात आलं. त्यानंतर नुक्कड नाटक आणि पश्चिम रेल्वेच्या सांस्कृतिक टीमचा संगीतमय कार्यक्रम रंगला. याने उपस्थितांची मने जिंकली. या महोत्सवात वांद्रे स्टेशनच्या इतिहासाची झलक दाखवणारी विशेष हेरिटेज फोटो प्रदर्शनी मांडण्यात आली आहे. दुर्मिळ जुन्या छायाचित्रांमधून स्टेशनचा भूतकाळ आणि त्याच्या विकासाचा प्रवास पाहायला मिळतोय. पहिल्या दिवशी फोटो प्रदर्शनाचं उद्घाटन आणि सांस्कृतिक कार्यक्रम हे मुख्य आकर्षण ठरलं.दुसऱ्या दिवशीही सोहळा सुरूच राहणार आहे. शनिवारी संध्याकाळी ५ वाजता होणारा 'आफ्रिकन आर्ट ऑफ ड्रमिंग' हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे. आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक अनुभव देणारा हा कार्यक्रम प्रेक्षकांसाठी पर्वणी असेल. समारोपाच्या दिवशीही विविध सांस्कृतिक आणि हेरिटेज उपक्रम होणार आहेत.जनसहभाग वाढावा म्हणून 'बांद्रा स्टेशन' या संकल्पनेवर आधारित कला आणि छायाचित्रण स्पर्धांचंही आयोजन करण्यात आलं आहे. तसंच आगंतुकांसाठी खास सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला आहे. तिथे नागरिक या सोहळ्याच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद करू शकतात. वांद्रे रेल्वे स्टेशन हे मुंबईतील सर्वात सुंदर उपनगरीय स्टेशनांपैकी एक आहे. १९ व्या शतकातील वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्य शैली आणि आकर्षक छतांच्या रचनेमुळे त्याला ग्रेड-१ हेरिटेज वास्तूचा दर्जा मिळाला आहे. या महोत्सवातून स्टेशनचं ऐतिहासिक महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणं आणि रेल्वेच्या वारशाबद्दल अभिमानाची भावना निर्माण करणं, हा पश्चिम रेल्वेचा उद्देश आहे.यात सहभागी व्हावं, असं आवाहन पश्चिम रेल्वेने केलं आहे.

फक्त 10 मिनिटांत बनवा चविष्ट मिठाई,



घरात तूप बनवल्यानंतर कढईच्या तळाशी उरणारी बेरी अनेक जण फेकून देतात. मात्र, हीच बेरी वापरून तुम्ही झटपट आणि चविष्ट मिठाई तयार करू शकता. तुपाचा खमंग सुगंध आणि दुधाचा स्वाद असलेली ही बेरी योग्य पद्धतीने वापरली, तर घरच्या घरी अगदी कमी साहित्यामध्ये स्वादिष्ट गोड पदार्थ बनवता येतो. विशेष म्हणजे, ही मिठाई तयार करण्यासाठी ना फार मेहनत लागते, ना बराच वेळ. अवघ्या 10 मिनिटांत तुम्ही बेरीच्या स्वादिष्ट वड्या तयार करू शकता.

बेरीपासून मिठाई बनवण्यासाठी लागणारे साहित्य तुपाची बेरी दूध साखर मिल्क पावडरताटाला लावण्यासाठी थोडे तूपबेरीच्या मिठाईची सोपी रेसिपीसर्वप्रथम तुपाची बेरी एका कढईत घेऊन मंद आचेवर थोडीशी परतून घ्या. त्यानंतर त्यामध्ये दूध घालून व्यवस्थित मिक्स करा. आता चवीनुसार साखर घालून मिश्रण पुन्हा परतून घ्या. शेवटी मिल्क पावडर घालून सर्व साहित्य एकजीव होईपर्यंत मिश्रण ढवळत राहा. मिश्रण घट्ट झाल्यानंतर एका ताटाला थोडे तूप लावून त्यामध्ये तयार मिश्रण जाडसर पसरवून घ्या. मिश्रण थोडे थंड झाल्यावर त्याच्या वड्या पाडा. अशा प्रकारे तुपाच्या बेरीपासून झटपट आणि चविष्ट मिठाई तयार होईल. ही रेसिपी @anjalis_chavist_kitchen या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर करण्यात आली आहे.

महात्मा फुलेंच्या पुण्यतिथीनिमित्त नेत्रदान-अवयवदानाचा संदेश

अहिल्यानगर : प्रतिनिधी

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १३६ व्या पुण्यतिथीनिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नेत्रदान आणि अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. महात्मा फुले यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांना अभिवादन करत मानवतेची सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या वेळी नेत्रदान व अवयवदान जनजागृती पोस्टरचे अनावरण करण्यात आले, तसेच जिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून नागरिकांचे नेत्रदान व अवयवदान संकल्पपत्र भरून घेण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते नेत्रदान व अवयवदान जनजागृती पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी नागरिकांना नेत्रदान आणि अवयवदानाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. मृत्यूनंतरही आपले अवयव दुसऱ्याच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करू शकतात, हा विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. या वेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जालिंदर बोरुडे, जिल्हा रुग्णालयाच्या अवयवदान समुपदेशन विभागाचे समुपदेशक सतीश अहिरे, बजरंग भुतारे, विष्णुपंत म्हस्के, गणेश कोल्हे, दीपक पाटोळे, सतीश खेतमाळीस, रवींद्र कांबळे, सुजित ठोफळ, प्रकाश साळवे, योगेश साठे आदी उपस्थित होते.उपमहापौर जाधव म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी संपूर्ण आयुष्य समाजातील वंचित, शोषित आणि गरजू घटकांच्या कल्याणासाठी समर्पित केले. शिक्षण, समता आणि मानवतेचा विचार त्यांनी समाजाला दिला. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त नेत्रदान व अवयवदानासारखा मानवतावादी उपक्रम राबविणे ही त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली आहे. नेत्रदान आणि अवयवदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून दुसऱ्याच्या आयुष्यात आनंद निर्माण करणारी मानवतेची महान सेवा आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या अवयवांमुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते, तर नेत्रदानामुळे



दृष्टी गमावलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश येऊ शकतो. मात्र, आजही समाजात नेत्रदान आणि अवयवदानाबाबत अनेक गैरसमज आहेत. ते दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती होणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.फिनिक्स सोशल फाऊंडेशनने सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून नेहमीच समाजहिताचे कार्य केले आहे. फिनिक्सच्या माध्यमातून डॉ. जालिंदर बोरुडे यांनी चालवलेल्या नेत्रदान चळवळीतून हजारो अंधांना नवदृष्टी मिळाली आहे. तसेच अवयवदानसाठी देखील त्यांचे सातत्याने कार्य सुरु आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते. प्रत्येकाने नेत्रदान व अवयवदानाचे महत्त्व समजून घेऊन स्वतः संकल्प करावा आणि आपल्या कुटुंबीयांनाही त्यासाठी प्रोत्साहित करावे. या मानवतावादी चळवळीत सहभागी झाल्यास अनेक गरजू रुग्णांना जीवनाची नवी संधी मिळू शकेल, असे आवाहन ॲड. जाधव यांनी केले.फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जालिंदर बोरुडे म्हणाले की, अवयवदान आणि नेत्रदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा आहे. एका व्यक्तीच्या मरणोत्तर अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते, तर नेत्रदानामुळे अंध व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण होतो. धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमधून जनजागृती केल्यास हा संदेश मोठ्या प्रमाणावर समाजापर्यंत पोहोचतो. प्रत्येक नागरिकाने अवयवदानाचा संकल्प करून आपल्या कुटुंबीयांनाही त्याबाबत माहिती देण्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा रुग्णालयाचे अवयवदान समुपदेशन विभागाचे समुपदेशक सतीश अहिरे म्हणाले की, अवयवदानाबाबत समाजात अजूनही अनेक गैरसमज आहेत. योग्य माहिती आणि जनजागृतीद्वारे हे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. अवयवदानामुळे अनेक गंभीर रुग्णांना जीवनदान मिळू शकते. प्रत्येकाने अवयवदानाबाबत सकारात्मक विचार करून शासनाच्या अधिकृत प्रक्रियेनुसार नोंदणी करावी. फिनिक्सने जिल्ह्यात नेत्रदान व अवयवदानचे मोठे कार्य उभे केले असल्याचे स्पष्ट करून अशा जनजागृती मोहिमांमुळे समाजात मोठा सकारात्मक बदल घडवून आणता येणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

छत्रपती संभाजीनगर
रवीवार .दि.29 नोव्हेंबर-2026

जळगावमध्ये 18 वर्षीय तरुणीसोबत धक्कादायक घटना



जळगाव : प्रतिनिधी

जेवण झाल्यानंतर दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढण्यासाठी अनेकजण हातात मिळेल त्या वस्तूचा वापर करतात. मात्र, ही सवय किती धोकादायक ठरू शकते, याचा प्रत्यय जळगावमधील एका घटनेतून आला आहे. दात कोरताना एका १८ वर्षीय तरुणीने चुकून सेफ्टी पिन गिळली. ही पिन तिच्या अन्ननलिकेत अडकल्याने कुटुंबीयांची घाबरगुंडी उडाली. मात्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रिया करून पिन बाहेर काढली आणि तरुणीला मोठ्या संकटातून वाचवले. नेमकी घटना काय ?मिळालेल्या माहितीनुसार, जळगावमधील ही १८ वर्षीय तरुणी दात कोरण्यासाठी सेफ्टी पिनचा वापर करत होती. याचवेळी चुकून तिच्या हातातून पिन घशातून अन्ननलिकेत गेली. टोकदार पिन अन्ननलिकेत अडकल्याने तरुणीला त्रास होऊ लागला. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रिया करत काढली पिनतरुणीच्या अन्ननलिकेत टोकदार वस्तू अडकल्याने डॉक्टरांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. जळगावच्या (Jalgaon) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कान, नाक व घसा विभागाच्या डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू केले. अत्यंत सावधगिरीने शस्त्रक्रिया करत अन्ननलिकेत अडकलेली सेफ्टी पिन बाहेर काढण्यात डॉक्टरांना यश आले. यामुळे तरुणीला मोठा दिलासा मिळाला. या यशस्वी उपचारासाठी अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. योगिता बावस्कर यांच्यासह वैद्यकीय पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. जळगावमधील या घटनेमुळे दात टोकरण्याच्या साध्या वाटणाऱ्या सवयीमधील धोका समोर आला आहे. त्यामुळे दात स्वच्छ करण्यासाठी कोणत्याही टोकदार वस्तूचा वापर टाळण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

शेतातील बोरं तोडली अन् शेतमालकाचा संताप अनावर झाला, शाळकरी मुलीला मारहाण

नाशिक : प्रतिनिधी

नाशिकच्या मालेगाव तालुक्यातून एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. शेतातील झाडावरून अवघी बोरं तोडल्याच्या कारणावरून एका शेतमालकाने शाळकरी मुलीला बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, संबंधित व्यक्तीच्या कृत्यावर नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नेमकं काय घडलं ?मिळालेल्या माहितीनुसार, अजंग-मालेगाव रस्त्यावरील काष्टी गावात हा प्रकार घडला. तीन शाळकरी मुली शाळेत जाण्यासाठी एसटी बसची वाट पाहत रस्त्याच्या कडेला उभ्या होत्या. यावेळी जवळच असलेल्या शेतातील बोराच्या झाडावर त्यांना बोरं दिसली. मुलींनी झाडावरील चार-पाच बोरं तोडली. मात्र, हा प्रकार



शेतमालकाच्या लक्षात येताच तो संतापाच्या भरात मुलींजवळ पोहोचला.बोरं तोडल्याचा जाब विचारण्याऐवजी त्याने एका मुलीला मारहाण करण्यास सुरुवात केली. संतापलेल्या शेतमालकाने मुलीच्या कानशिलात जोरदार मारली. हा फटका इतका जोरात होता की, मुलगी थेट रस्त्यालगत असलेल्या खड्डयात जाऊन पडली. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. विशेष म्हणजे, उपस्थित नागरिकांनी या व्यक्तीला जाब विचारण्याचा प्रयत्न केला असता त्याने त्यांच्याशीही हुज्जत घातल्याचे व्हिडिओतून समोर आले आहे. 'काय करायचे ते करून घ्या,' अशा शब्दांत त्याने अरेरावी केल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. चार-पाच बोरं तोडल्याच्या कारणावरून एका शाळकरी मुलीवर हात उचलण्याचा अधिकार कोणी दिला, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.]मात्र, उपलब्ध माहितीनुसार घटनेनंतरही गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे आता पोलीस या प्रकरणी काय भूमिका घेतात आणि संबंधित व्यक्तीवर कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

डिसेंबरमध्ये बँका किती दिवस राहणार बंद ? RBI ची सुट्ट्यांची यादी जाहीर

जर तुम्ही डिसेंबर महिन्यात बँकेशी संबंधित महत्त्वाचे काम करण्याचा विचार करत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. कारण डिसेंबर २०२६ मध्ये देशातील विविध राज्यांमध्ये अनेक दिवस बँकांना सुट्ट्या असणार आहेत.

त्यामुळे चेक क्लिअरन्स, केवायसी, डिमांड ड्राफ्ट किंवा इतर बँकिंग कामांसाठी शाखेत जाण्यापूर्वी सुट्ट्यांची यादी तपासणं गरजेचं आहे.२०२६ वर्षाचा शेवटचा महिना म्हणजेच डिसेंबर आता सुरू होणार आहे.

या महिन्यात नाताळ आणि नवीन वर्षाच्या स्वागतासह अनेक स्थानिक सण आणि विशेष दिवसांमुळे बँका बंद राहणार आहेत. याशिवाय दर रविवारी आणि महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारीही बँकांचे कामकाज बंद असेल.

डिसेंबर महिन्यात ६, १३, २० आणि २७ डिसेंबर रोजी रविवार असल्याने बँकांना साप्ताहिक सुट्टी असेल. तर १२ डिसेंबर आणि २६ डिसेंबर रोजी दुसरा आणि चौथा शनिवार असल्यामुळे बँका बंद राहतील. याशिवाय २५ डिसेंबर रोजी नाताळनिमित्त देशभरातील बँकांना सुट्टी असेल.मात्र, काही राज्यांमध्ये स्थानिक सणांमुळे अतिरिक्त सुट्ट्या असणार आहेत.

विशेषतः सिक्कीम आणि मेघालयमधील बँक ग्राहकांना या महिन्यात अधिक सुट्ट्यांचा सामना करावा लागणार आहे. सिक्कीममध्ये ९, १० आणि ११ डिसेंबर रोजी लोसुंग आणि नामसुंग सणानिमित्त बँका बंद राहतील. तर मेघालयमध्ये १२ डिसेंबर रोजी पा तोगन नेंगमिंजा संगमा यांची पुण्यतिथी, १८ डिसेंबर रोजी यू सोसो थाम यांची पुण्यतिथी आणि ३० डिसेंबर रोजी यू कियांग नांगबाह यांच्या पुण्यतिथीनिमित्त बँकांचे कामकाज बंद असेल.

सिंहस्थ कुंभमेळ्यात 'शून्य अपघात'चे लक्ष्य, आपत्ती व्यवस्थापन आराखड्यांना वेग

नाशिक : प्रतिनिधी

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ सुरक्षित आणि अपघातमुक्त पार पाडण्यासाठी प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनाच्या पूर्वतयारीला वेग दिला आहे. संभाव्य धोके, गर्दी व्यवस्थापन, अग्निसुरक्षा, औद्योगिक सुरक्षितता आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेच्या तयारीचा आढावा घेत विविध शासकीय विभागांनी आपापले कृती आराखडे सादर केले. सर्व विभागांनी १५ डिसेंबर २०२६ पूर्वी आराखडे पूर्ण करावेत, असे निर्देश कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी दिले असून, 'शून्य अपघात' हेच या नियोजनाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आपत्ती व्यवस्थापनाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाच्या कार्यालयात बैठक झाली. यावेळी विविध यंत्रणांनी दृकश्राव्य माध्यमातून विभागनिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखड्यांचे सादरीकरण केले. संभाव्य आपत्ती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आपत्कालीन परिस्थितीतील कार्यवाहीवर चर्चा करण्यात आली.या बैठकीस नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणचे अतिरिक्त आयुक्त तथा अपर जिल्हाधिकारी उदय किसवे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहित राजपूत, कुंभमेळा तहसीलदार मकरंद दिवाकर यांच्यासह विविध विभागांचे कार्यकारी अभियंते, नाशिक महानगरपालिकेतील संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी, विभागप्रमुख आणि सल्लागार उपस्थित होते.कुंभमेळ्यात मोठ्या संख्येने भाविक येणार असल्याने गर्दीचे नियोजन, जोखीम ओळखणे, अग्निसुरक्षा, अखंडित पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा आणि पायाभूत सुविधांची सुरक्षितता



यावर भर देण्यात आला. तसेच उपलब्ध मनुष्यबळ, वाहने व यंत्रसामग्रीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार अतिरिक्त व्यवस्था करण्याबाबत चर्चा झाली. अंतर्गत व बाह्य वाहनतळ, पार्किंग क्षमता आणि भाविकांची सुरक्षित वाहतूक यांचे नियोजनही चर्चेत घेण्यात आले.औद्योगिक सुरक्षिततेच्या दृष्टीने कारखान्यांमधील सुरक्षा व्यवस्था, धोकादायक रसायने व वायूंचे उत्पादन, साठवणूक, हाताळणी आणि वाहतूक याबाबत माहिती सादर करण्यात आली. रसायने किंवा वायूंची गळती, आग आणि स्फोट यांसारख्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना व आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेच्या सज्जतेवर भर देण्यात आला.आपत्कालीन परिस्थितीत विविध विभागांच्या जबाबदाऱ्या, संपर्क व्यवस्था, परस्पर समन्वय, आवश्यक प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक सराव याबाबतही चर्चा झाली. तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता संबंधित विभागांनी नोंदविल्यास, उपलब्ध मनुष्यबळाच्या अनुषंगाने प्राधिकरण स्तरावर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सर्व विभागांना कळविण्यात आले.दरम्यान, मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी १५ डिसेंबर २०२६ पूर्वी सर्व विभागांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. सिंहस्थ कुंभमेळ्याचे सुरक्षित आणि सुरळीत आयोजन करण्यासाठी सर्व विभागांनी सक्षम कृती आराखडे तयार करून परस्पर समन्वयातून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मतदारसंघ पुनर्रचनेला एकनाथ शिंदेंचा पाठिंबा

मुंबई : प्रतिनिधी



मतदारसंघांची पुनर्रचना ही भारतीय लोकशाही अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्यासाठी काळाची गरज असल्याचे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले आहे. या पुनर्रचनेमुळे प्रत्येक राज्यातील जागांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ होणार असून, कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नसल्याचा दावाही त्यांनी केला आहे. यासंदर्भात शिंदे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट शेअर करत आपली भूमिका मांडली. मतदारसंघांचा आकार सुटसुटीत झाल्यास लोकप्रतिनिधींना तळागाळातील नागरिकांपर्यंत थेट पोहोचणे शक्य होईल. त्यामुळे विकासकामांचा वेग वाढण्यास मदत होईल, असे शिंदे यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.दरम्यान, मतदारसंघ पुनर्रचनेच्या प्रक्रियेतून 'नारी शक्ती वंदन कायद्या'अंतर्गत महिलांना ३३ टक्के आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. संसदेत महिलांना त्यांचा हक्काचा आवाज मिळणे ही महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली उचललेले हे पाऊल केवळ राजकीय निर्णय नसून महिला सक्षमीकरण आणि देशाच्या प्रगतीला दिशा देणारी क्रांती असल्याचे शिंदे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे तसेच, संकुचित राजकारण आणि पक्षीय मतभेद बाजूला ठेवून राष्ट्रहिताला प्राधान्य देत या ऐतिहासिक निर्णयाला सर्वांनी एकमताने साथ द्यावी, असे आवाहनही एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

143 झाडं पुनर्रोपित करणार; वृक्ष प्राधिकरणाने दिली मंजुरी

मुंबई: प्रतिनिधी

धारावी पुनर्विकास प्रकल्पामधील धारावीमधील दोन ठिकाणच्या बांधकामांमधील बाधित झाडांचे प्रस्ताव वृक्षप्राधिकरणाने मंजूर केले आहे. यामध्ये दोन्ही ठिकाणच्या बांधकामांमध्ये 67 झाडे कापणे आणि 143 झाडे पुनर्रोपित करणे अशाप्रकारे अशाप्रकारे 210 बाधित झाडे काढण्यास वृक्ष प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे.धारावी पुनर्विकास प्रकल्पाला गती देण्यासाठी येथील बांधकामांमध्ये बाधित झाडे हटवण्यासाठी वृक्ष प्राधिकरणापुढे प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. यामध्ये धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत इमारतीच्या पुनर्बांधकामानुसार 20 मीटर रुंद रस्त्यांच्या कामात एकूण 75 झाडे बाधित होत आहे. त्यात 14 झाडे कापली जाणार आहेत, तर 61 झाडे पुनर्रोपित केली जाणार आहेत. या बाधित झाडांच्या बदल्यात पालघर जिल्ह्यातील पोचाडे तामसाई येथे 8 हेक्टर जागेत एकूण 961 झाडे लावली जाणार आहेत. याठिकाणी 15 प्रकारची झाडे लावली जाणार आहेत.तर धारावी विकास प्रकल्पांतील माटुंगा येथील सेंट्रल रेल्वे वसाहतीतील आर.पी.एफ ग्राऊंड रेल्वे कॉलनी येथील रेल्वे परिचालन सोयीसुविधांच्या पुनर्विकासानुसार वाहन मार्गिकेच्या कामात एकूण 135 बाधित होत आहे. त्यातील 53 झाडे कापणे आणि 82 झाडे पुनर्रोपित केली जाणार आहे. ही झाडांच्या बदल्यात पालघर जिल्ह्यातील अक्करपट्टी येथे 15 प्रकारची झाडे लावली जाणार आहेत.

नाशिकच्या दुगांव ग्रामपंचायतीला 1 कोटींचे बक्षीस, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात मारली बाजी



नाशिक : प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत नाशिक जिल्ह्याने विभागस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नाशिक तालुक्यातील दुगांव (पेसा) ग्रामपंचायतीने उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कामगिरीबद्दल ग्रामपंचायतीला तब्बल १ कोटी रुपयांचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यामुळे दुगांव ग्रामपंचायतीच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.ग्रामविकास व पंचायत राज विभाग आणि जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० अंतर्गत विभागीय पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता.अहिल्यानगर येथील नगर कल्याण रोडवरील द्वारका लॉन येथे हा कार्यक्रम पार पडला. याच कार्यक्रमात 'सरपंच परिसंवाद – दुष्काळावर मात, समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावर विभागीय कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि ग्रामविकास व पंचायतराज राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार मोनिका राजळे, आमदार विक्रमसिंह पाचपुते, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या पुरस्कार स्पर्धेत दुगांव ग्रामपंचायतीने आपल्या कामगिरीच्या जोरावर इतर ग्रामपंचायतींना मागे टाकत प्रथम क्रमांक मिळवला. ग्रामपंचायतीने गावात लोकसहभागातून राबवलेली विविध विकासकामे, प्रशासकीय कामकाजातील कार्यक्षमता, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले नियोजनबद्ध प्रयत्न यामुळे या ग्रामपंचायतीला हा बहुमान मिळाला आहे.दरम्यान, या यशाबद्दल नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी दुगांव ग्रामपंचायतीचे सरपंच ज्ञानेश्वर गवे, उपसरपंच हरिभाऊ धोंडगे, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब बोराडे यांच्यासह कर्मचारी व ग्रामस्थांचे अभिनंदन केले. तसेच यापुढेही लोकसहभागातून गावांच्या सर्वांगीण विकासाची चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहन त्यांनी केले. दुगांव ग्रामपंचायतीच्या या यशामुळे नाशिक जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सुनेत्रा पवार पहाटेच बारामतीत, विकासकामांचा घेतला आढावा



बारामती : प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार सध्या बारामती दौऱ्यावर असून, त्यांनी शनिवारी (२८ नोव्हेंबर) भल्या पहाटेच शहरातील सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना सोबत घेत त्यांनी विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच कामे निर्धारित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

बारामती शहरात सध्या विविध विकासप्रकल्पांची कामे सुरू आहेत. या कामांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी सुनेत्रा पवार यांनी सकाळीच पाहणी दौरा केला. यावेळी त्यांनी कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि काम पूर्ण होण्याच्या कालमर्यादेबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

विकासकामे केवळ वेळेत पूर्ण होणे पुरेसे नाही, तर ती दर्जेदार आणि टिकाऊ असणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले. कामांच्या गुणवत्तेशी कोणत्याही प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही. सर्व संबंधित विभागांनी एकमेकांशी समन्वय ठेवून कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. तसेच प्रत्येक कामाच्या दर्जावर काटेकोर लक्ष द्यावे, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

दरम्यान, लोकनेते अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीप्रमाणे पहाटेपासूनच विकासकामांचा प्रत्यक्ष आढावा घेत सुनेत्रा पवार यांनी बारामतीच्या विकासाला गती देण्यावर भर दिला. या पाहणी दौऱ्यावेळी संबंधित विभागांचे अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

छत्रपती संभाजीनगर
रवीवार .दि.29 नोव्हेंबर- 2026

गोरेगावमधील कृष्णवाटिका रोड, साई मार्ग ना फेरीवाला क्षेत्र

स्थायी समिती अध्यक्षांनी तातडीने सातत्यपूर्ण कारवाई करण्याचे दिले आदेश

गोरेगाव : प्रतिनिधी



गोरेगाव पूर्व येथील साई मार्ग आणि कृष्णवाटिका मार्गाच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरु आहे, त्यामुळे आधीच वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झालेली असताना येथील फेरीवाल्यांच्या वाढत्या संख्येमुळे या समस्येत अधिक भर पडल्याची चिंता स्थानिक नगरसेवकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे हे दोन्ही रस्ते ना फेरीवाला क्षेत्र म्हणून तात्काळ जाहीर करण्याची मागणी स्थानिक नगरसेवकांची असल्यामुळे याठिकाणी तातडीने कारवाई केली जावी तसेच येथील कारवाई ही सातत्यपूर्ण राहावी असे निर्देश महापालिका स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी प्रशासनाला दिलेमुंबई महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये भाजपच्या प्रिती सातम यांनी हरकतीच्या मुद्दयाद्वारे गोरेगाव पूर्व येथील साई मार्ग आणि कृष्णवाटिका मार्गावरील फेरीवाल्यांच्या वाढत्या समस्येमुळे स्थानिक नागरिक त्रस्त असल्याची कैफियत हरकतीच्या मुद्दयाद्वारे मांडली. अनुज्ञापन विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे विभागात वाहतूक कोंडीची निर्माण होत असल्याचा हरकतीचा मुद्दा उपस्थित करत सातम यांनी दोन मिनिटाच्या प्रवासासाठी नागरिकांना पाऊण तास तिष्ठत राहावे लागत असल्याचे सांगितले. दिडोंशी न्यायालयाच्या समोरच्या बाजुला असलेल्या या रस्त्यांवर कृष्णवाटिका आणि साईमार्ग या दोन्ही रस्त्यांचे सिमेंटीकरण सुरु आहे. दुसरीकडे गोरेगाव मुलुंड लिंक रोडचे काम सुर आहे. त्यामुळे आधीच वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झालेली असलेली असतानाच साई मार्ग आणि कृष्णवाटिका मार्गावर चक्क फेरीवाल्यांनी रस्त्यांवरच व्यावसाय थाटले आहे. त्यामुळे या रस्त्यांवरील वाहतूक कोंडीची समस्या अधिक तीव्र झाली आहे.मात्र येथील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास महापालिका प्रशासनाचे अनुज्ञापन (परवाना) विभाग अपयशी ठरत असून कारवाईपूर्वीच फेरीवाल्यांना वाहनाच्या चालकांकडून माहिती दिली जाते. त्यामुळे फेरीवाल्यांवरील कारवाईची नोटंकी सुरु असल्याने लोकप्रतिनिधी म्हणून विभागांत नगरसेवकांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. एका बाजुला पदपथ मोकळे करण्याचा प्रयत्न करत आहोत, पण पदपथ मोकळे करताना हे फेरीवाले चक्क रस्त्यावर व्यवसाय थाटून बसल्याने वाहनांचाही रस्ता अडवून बसले आहेत. त्यामुळे प्रभागातील सर्वच फेरीवाल्यांवर कारवाई करता येत नसली तरी कृष्णवाटिका मार्ग आणि साई मार्ग हे दोन्ही रस्ते हे ना फेरीवाले क्षेत्र म्हणून जाहीर करा किंवा कायमस्वरुपी कारवाई केली जावी. कोणत्याही परिस्थितीत याठिकाणी फेरीवाल्यांना बसायला देवू नये. कारण रस्तेही जर या फेरीवाल्यांनी अडवले तर आधीच वाहतूक कोंडीत अडकून प्रवास करणाऱ्या नागरिकांना पुढे या रस्त्यांवरील वाहतूक कोंडीचाही फटका बसतो. त्यामुळे या दोन्ही रस्त्यांवरील फेरीवाल्यांवर कायमस्वरुपी हटवण्यात यावे अशी मागणी सातम यांनी केली. यावर अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी तातडीने पुन्हा पुन्हा कारवाई केली

बागेत बाकावर बसून रडणाऱ्या महिलेला दंड!



कधीकधी, आपण एकटे असतो, अस्वस्थ वाटत असते, तेव्हा कोणाशीतरी बोलण्याऐवजी थोडा वेळ एकटे बसावेसे वाटते. अशावेळी आपण बागेत फिरायला जातो किंवा विचार करण्यासाठी शांत ठिकाणी बसतो. विचार करता करता मनसोक्त रडण्याचा प्रयत्न करणे, हे जवळपास प्रत्येकाने कधी ना कधी केले असेल. पण हेच करताना तुम्हाला कधी कुठल्या अधिकाऱ्याने दंड आकारला तर? असाच एक धक्कादायक प्रकार जर्मनीमध्ये घडला आहे.जर्मनीतील गेल्सेनकिर्चेन येथील एका 31 वर्षीय महिलेसोबत नेमके हेच घडले. केवळ नाराज असताना मुलांच्या खेळाच्या मैदानातील बाकावर बसल्यामुळे तिला 25 युरो म्हणजे सुमारे 27 डॉलर, किंवा अंदाजे 2,300 रुपये दंड भरावा लागला. या वृत्तामुळे अनेक स्थानिक नागरिक नाराज झाले असून, पालिकेच्या अधिकाऱ्यांनी आपली सारासार बुद्धी कार्यालयातच सोडली होती का, असा जोरदार सवाल उपस्थित केला आहे.हाना नावाने ओळखल्या जाणाऱ्या या महिलेने जर्मन वृत्तपत्र बिल्डला सांगितले की, तिला तिच्या मावशीशी फोन आला होता, तिच्याशी बोलत असताना ती एका बाकावर बसली होती. वैयक्तिक तणावामुळे ती स्वतःला सावरू शकली नाही आणि तेथे रडू लागली. परंतु तिला एकांत मिळण्याऐवजी, अचानक तिच्यासमोर पालिकेचे तीन सार्वजनिक सुव्यवस्था अधिकारी उभे दिसले. त्या अधिकाऱ्यांनी तिला विचारले की समोर खेळत असलेल्या मुलांपैकी कोणी तिचे आहे का? जेव्हा तिने नाही असे सांगितले, तेव्हा त्यांनी तिला सांगितले की मुलांशिवाय प्रौढांना या परिसरात प्रवेश करण्याची परवानगी नाही आणि तात्काळ तिच्या हातात 25 युरो दंडाची पावती दिली. या घटनेमुळे जगभरात याची चर्चा होत आहे.ती महिला वैयक्तिक आणि आर्थिक समस्यांशी झगडत होती. त्यात तिला 25 युरो, म्हणजेच सुमारे 2300 रुपयांचा दंड ठोठावला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्या महिलेला रडल्याबद्दल किंवा फोनवर बोलल्याबद्दल नव्हे, तर मुलांच्या खेळण्याच्या जागेत एकही मूल नसताना बसल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला. ही घटना जर्मनीतील गेल्सेनकिर्चेन येथील ग्लुकॉफपार्कमध्ये घडली. सदर महिला रसायनशास्त्राचा अभ्यास करत होती आणि तिच्या वैयक्तिक आयुष्यातही कठीण काळातून जात होती. त्यामुळे, तिने काही वेळ एकटे राहून आराम करण्याचे ठरवले. हानाच्या म्हणण्यानुसार, तिला त्या क्षणी एकटे राहायचे होते. तिला रडताना कोणीही पाहू नये असे तिला वाटत होते. पण मग, शहराचे तीन अधिकारी तिथे आले जे शहरातील सार्वजनिक सुव्यवस्था आणि स्थानिक नियमांवर देखरेख ठेवतात. त्यांनी हानाला विचारले की जवळच झोके घेत असलेली दोन मुले तिची आहेत का? हानाने उत्तर दिले की नाही. त्यावर अधिकाऱ्यांनी तिच्याकडे ओळखपत्र मागितले आणि तिला सांगितले की, मुलांच्या खेळाच्या मैदानात एकही मूल नसताना उपस्थित राहून ती नियमांचे उल्लंघन करत आहे. त्यानंतर तिला 25 युरोचा दंड ठोठावण्यात आला. कोणत्या नियमांतर्गत दंड आकारण्यात आला?जर्मनीतील गेल्सेनकिर्चेन शहरात, स्थानिक प्रशासनाने मुलांच्या खेळाच्या मैदानांसंदर्भात एक नियम बनवला आहे. ज्यात 14 वर्षांपर्यंतची मुले पालक, पालकत्व स्वीकारलेली व्यक्ती किंवा काळजीवाहकासोबत खेळाच्या मैदानात प्रवेश करू शकतात. परंतु, मुलाशिवाय आलेल्या प्रौढ व्यक्तीला खेळाच्या मैदानात थांबण्याची परवानगी नाही. हा नियम केवळ झोपाळे किंवा इतर खेळण्याच्या साधनांचा वापर करण्यापुरताच नाही, तर बाकांवर बसण्यालाही लागू होतो. याचा अर्थ असा की, जरी एखादी व्यक्ती मुलांसोबत नसली आणि केवळ आराम करण्यासाठी खेळाच्या मैदानातील बाकावर बसली, तरीही तिच्यावर कारवाई होऊ शकते. हानाला याच नियमांतर्गत दंड आकारण्यात आला आहे.हानाने या कृतीबद्दल आपला संताप व्यक्त केला आहे. तिचे म्हणणे आहे की, ती आधीच खूप अस्वस्थ आहे आणि त्यावेळी तिला सहानुभूतीची गरज होती. जेव्हा अधिकाऱ्यांनी तिला रडताना पाहिले, तेव्हा त्यांनी किमान एकदा तरी विचारायला हवे होते की, तिची तब्येत ठीक आहे का किंवा तिला काही मदतीची गरज आहे का? किंवा अधिकाऱ्यांनी तिला नियम समजावून सांगून दुसरीकडे बसायला सांगायला हवे होते. जर त्यांनी तसे केले असते, तर ती सहजपणे तिथून निघून गेली असती. पण तिची परिस्थिती न समजता त्यांनी थेट दंड आकारल्यामुळे तिला खूप वाईट वाटले. त्यावेळी तिला एक माणूस म्हणून स्वतःची काहीच किंमत नाही असे वाटले. मुलांच्या खेळाच्या मैदानांसाठी नियम असावेत पण त्यांची अंमलबजावणी करताना त्यात थोडी माणुसकी असायला हवी. पुढील प्रशासकीय कारवाई किंवा अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी तिने दंड भरला. रम्यान, शहर प्रशासनाने या प्रकरणात अधिकाऱ्यांच्या कृतीचे समर्थन केले आहे . प्रवक्ते मार्टिन शुलमन यांनी 25 युरोचा दंड वाजवी आणि तुलनेने किरकोळ असून तो प्रस्थापित नियमांच्या चौकटीत असल्याचे म्हटले आहे. तसेच शहराच्या नियमांची अंमलबजावणी करणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. त्यांच्या मते, या प्रकरणाच्या अंतर्गत चौकशीत अधिकाऱ्यांकडून कोणतेही अयोग्य वर्तन झाल्याचे दिसून आलेले नाही. परंतु, या कारवाईबाबत स्थानिक रहिवासी आणि राजकारण्यांची वेगवेगळी मते आहेत.

इंडोनेशियात बेकायदा सोन्याच्या खाणीत पाणी शिरलं; 13 कामगारांचा मृत्यू, 13 बेपत्ता



इंडोनेशियाच्या पश्चिम जावा प्रांतात एका अनधिकृत सोन्याच्या खाणीत पाणी शिरल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. या घटनेत आतापर्यंत 13 कामगारांचा मृत्यू झाला असून, 13 कामगार अजूनही बेपत्ता आहेत. गुरुवारी स्थानिक शोध आणि बचाव पथकाच्या प्रमुख देसियाना कर्तिका बहारी यांनी मृतांचा आकडा जाहीर केला. बेपत्ता कामगारांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकाला पाणी, अंधार आणि निसरड्या, अरुंद वाटेचा सामना करावा लागत आहे. पोलिसांना या घटनेची माहिती मंगळवारी मिळाली. मात्र प्रत्यक्षात पाणी शिरण्याची घटना त्याच्या सुमारे 16 तास आधीच घडली होती. त्यानंतर जवळच्या सरकारी खाण कंपनी पीटी अँटमने बुधवारी मध्यरात्रीनंतर जकार्ता शोध आणि बचाव संस्थेला औपचारिक माहिती दिली. त्यानंतरच पूर्ण ताकदीनं बचाव मोहीम सुरू झाली. ही खाण बेकायदेशीरपणे चालवली जात असल्यामुळे अधिकाऱ्यांना लगेच माहिती मिळाली नाही, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं. सुरुवातीला स्थानिक खाण कामगार आणि गावकऱ्यांनी स्वतःच खाणीतलं पाणी बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पण परिस्थिती हाताबाहेर गेल्यानंतरच अधिकाऱ्यांना कळवण्यात आलं. ही खाण बोगोर येथील पोंगकोर परिसरात आहे. हा डोंगराळ भाग राजधानी जकार्तापासून सुमारे 60 किलोमीटर दक्षिणेला आहे. इथे सरकारी कंपनी अँटम सोन्याच्या खाणकामाचं काम करते. बचाव मोहिमेत सुमारे 325 जवान गुंतले आहेत. खाणीचे खड्डे सुमारे 100 मीटर खोल आहेत. आत अरुंद जागा, कमी प्रकाश आणि निसरडी जमीन यामुळे बचावकार्यात मोठ्या अडचणी येत आहेत."खड्ड्याची खोली, अरुंद वाट आणि कमी प्रकाश, या गोष्टी लक्षात घेऊनच शोधाची रणनीती ठरवली जात आहे. बचाव पथकाच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिलं जात आहे," असं देसियाना यांनी सांगितलं. पश्चिम जावा पोलीस प्रवक्ते हेंद्रा रोचमावन यांनी सांगितलं की, सोमवारी खाणीत पाणी शिरण्यापूर्वी 11 कामगार सुरक्षितपणे बाहेर पडू शकले. इंडोनेशियासारख्या खनिजसंपत्ती असलेल्या देशात लहान प्रमाणावर आणि अनधिकृत खाणकामामुळे अशा दुर्घटना वारंवार घडतात. दुर्गम भागात असलेल्या या खाणींवर नियंत्रण ठेवणं अधिकाऱ्यांसाठी अवघड ठरतं, असंही सांगितलं जात आहे. बेपत्ता कामगारांचा शोध अजूनही सुरू आहे.

16 डिसेंबरपूर्वी बांगलादेशात महाभूकंप! हसीनांच्या निकटवर्तीयांना अटक

ढाका ; प्रतिनिधी



: माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या बांगलादेशात परतण्याच्या नियोजित दौऱ्याला काहीच काळ शिल्लक असताना, तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील सरकारने धडक कारवाई सुरू केल्याचे समोर आले आहे. सरकारी वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे अधिकाऱ्यांनी ढाका येथील धनमंडी-27 परिसरातून शेख हसीना यांच्या 3 निकटवर्तीयांना ताब्यात घेतले. यामध्ये माजी उपप्रेस सचिव के. एम. सखावत मून, माजी उपजिल्हाधिकारी मोहम्मद इलियास हुसेन आणि प्राप्तिकरविषयक वकील सूफी मोहम्मद अल मामून यांचा समावेश आहे.सत्ताधारी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या (बीएनपी) विद्यार्थी संघटनेच्या म्हणजेच जातीयताबादी छात्र दलाच्या (जेसीडी) कार्यकर्त्यांनी आधी या तिघांना पकडले आणि त्यानंतर त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले. मोहम्मदपूर पोलीस ठाण्याचे ड्युटी ऑफिसर आणि उपनिरीक्षक मसुदुर रहमान यांनी सांगितले की, अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क आणि प्रश्न उपस्थित केले जात आहेत.दरम्यान, 16 डिसेंबर रोजी शेख हसीना भारतातून बांगलादेशात परतण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना देशातील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बीएनपी सरकारने संवेदनशील भागांत बंदोबस्त वाढवत सीमा सुरक्षा दलाच्या निमलष्करी पथकांच्या 108 तुकड्या तैनात केल्या आहेत. यातील 56 तुकड्या हसीना यांचा मूळ जिल्हा असलेल्या गोपालगंजमध्ये तैनात केल्या गेल्या आहेत.गेल्या काही आठवड्यांत बांगलादेशात हिंसक घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. रेल्वेगाड्या, बस, बँका आणि इतर वाहनांची जाळपोळ करण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. नोव्हेंबरच्या सुरुवातीपासून सुरू झालेल्या राजकीय हिंसाचारात आतापर्यंत किमान 4 जणांचा मृत्यू झाला आहे, तर 4 पोलीस ठाण्यांसह अनेक वाहने जाळण्यात आली आहेत. या हिंसाचारामागे अवामी लीग आणि त्यांच्याशी संबंधित कार्यकर्त्यांचा हात असल्याचा पोलिसांचा आरोप आहे. अवामी लीगच्या कारवायांवर बंदी असतानाही, हा पक्ष ऑनलाइन माध्यमांद्वारे 29 आणि 30 नोव्हेंबर रोजी 'लॉकडाऊन' आंदोलनाचे आवाहन करत असल्याने 16 डिसेंबर जवळ येताच तणाव आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. ऑगस्ट 2024 मध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उठावानंतर सरकार कोसळले आणि शेख हसीना यांनी ढाका सोडून भारतात आश्रय घेतला. तेव्हापासून त्या भारतातच आहेत. 2024 मधील उठावादरम्यान आंदोलकांवर झालेल्या कारवाईप्रकरणी विशेष न्यायाधिकरणाने त्यांच्या अनुपस्थितीत त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. मात्र, हसीना यांनी सर्व आरोप फेटाळून लावत या कायदेशीर प्रक्रियेच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. केली असून, मागणी मिळाल्याचे भारताने मान्य केले असले तरी प्रक्रियेनुसार तपासणी सुरू असून अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

नगरमध्ये 550 किलो गोमांस जप्त

अहिल्यानगर : प्रतिनिधी

शहरातील मुकुंदनगर परिसरात सुरू असलेल्या अवैध गोमांस विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ५५० किलो गोमांसासह एकूण १ लाख ६६ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे, तर दुसरा आरोपी फरार झाला आहे. ही कारवाई २७ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार संदीप पवार, अरविंद भिंगारदिवे, शाहीद शेख आणि अमृत आढाव यांचे पथक तयार करून अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्याच्या सूचना देत पथकास रवाना केले. दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी तपास पथक भिंगार कॅम्प पोलिस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत असताना पथकाला गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार, मुकुंदनगर येथील रहिवासी इरफान कुरेशी हा संजोगनगर, मुकुंदनगर येथे नूर बानु शेख यांच्या घरावरील पत्र्याच्या खोलीमध्ये गोमांसाची विक्री करत होता. या माहितीच्या आधारे पथकाने पंचांच्या उपस्थितीत नमूद ठिकाणी जाऊन खात्री केली. त्या वेळी एक इसम गोवंशीय जनावरांची कत्तल केलेल्या गोमांसाचे तुकडे करताना आढळून आला.पथकाने घटनास्थळावरून इरफान एजाज कुरेशी (वय ४०, रा. अब्दुल रजा मस्जीदजवळ, संयोगनगर, मुकुंदनगर, अहिल्यानगर) यास ताब्यात घेतले. घटनास्थळाची तपासणी करून पथकाने १ लाख ६५ हजार रुपये किमतीचे ५५० किलो गोमांस, ६०० रुपये किमतीचे दोन सत्तुर व दोन चाकू आणि १ हजार रुपये किमतीचा एक इलेक्ट्रिक काटा असा एकूण १ लाख ६६ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ताब्यात घेतलेल्या आरोपीकडे जप्त मुद्देमालाबाबत अधिक विचारपूस करण्यात आली. त्या वेळी हा मुद्देमाल पप्पू कैयाज कुरेशी (रा. झेंडीगेट, अहिल्यानगर, फरार) याच्या मालकीचा असल्याची माहिती त्याने दिली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियमनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

काशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-1 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.**: MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**